# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 152 |
| स्थळ | : | विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | गुरुवार, दिनांक : 21 जानेवारी 2016 |
| वेळ | : | दुपारी 3.00 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)


## कार्यवृत्त

152 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, गुरुवार, दिनांक 21 जानेवारी, 2016 रोजी दुपारी 3.00 वाजता, विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा.श्री.वाकडे प्रफुल, संचालक, व्यावसायिक व प्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी — सदस्य
3. मा. श्री. ज्ञानदेव नाठे, संचालक,तंत्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी — सदस्य
4. मा. डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग — सदस्य
5. मा. श्री. हेमंत टकले, मुंबई — सदस्य
6. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
7. डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव — सचिव

वित्त अधिकारी, वित्त विभागआणि परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा. संचालक,उच्च शिक्षण, पुणे — सदस्य
5. मा. डॉ. डब्ल्यु. एन.गाडे, कुलगुरु, पुणे — सदस्य
6. मा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,जळगाव — सदस्य
7. मा. श्री. उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
8. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
9. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य
10. मा. डॉ. बंदी व्यंकटेशवारलू, कुलगुरु, परभणी — सदस्य
11. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 152.1.0 | | स्वागत व सादरीकरण<br>**कुलसचिव तथा सचिव यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व त्यानंतर बैठकीच्या कामकाजास सुरवात झाली.** |
| 152.2.0 | 152.2.1 | दि. 19 नोव्हेंबर, 2015 रोजी झालेल्या 151 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा. कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे. (सहपत्र A)<br>**व्य.मं.ठराव: 19 नोव्हेंबर, 2015 रोजी झालेल्या 151 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करून त्यावर मा. कुलगुरू यांनी स्वाक्षरी केली.** |
| | 152.2.2 | दि. 19 नोव्हेंबर, 2015 रोजी झालेल्या 151 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.(सहपत्र B)<br>**व्य.मं.ठराव: दिनांक 19 नोव्हेंबर, 2015 रोजी झालेल्या 151 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| 152.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 152.3.1<br>वि.स. बैठक<br>6.3.1 | विद्यापीठाचे नॉन ऑपरेटिव्ह खाती बंद करणेबाबत...<br>(टिपणी: विद्यापीठाचे सनदी लेखापालांनी सन 2009-10 ते 2013-14 ह्या वर्षांच्या लेखापरिक्षण अहवालात विद्यापीठाचे नॉन ऑपरेटिव्ह खाती बंद करण्यात यावीत अशी सूचना केली होती. सदर सुचनेनुसार एकूण 21 खाती बंद करणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. एकूण 15 खाती बंद झालेली असून त्यातील रक्कम रु.11,75,06,582/- Central Bank of India च्या सीडी-1 खात्यात जमा झालेली आहे. उर्वरित 6 खाती बंद करण्याबाबत संबंधित बँकांकडून कार्यवाही सुरु आहे.)(सहपत्र-C)<br>**वि.स.ठराव** - वित्त विभागाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली व उर्वरित नॉन ऑपरेटिव्ह खातेही बंद करावेत असे ठरले. सदरची बाब व्यवस्थापन मंडळाच्या माहितीसाठी सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 152.3.2<br>वि.स. बैठक<br>6.3.2 | नोव्हेंबर 2015 च्या परीक्षेकरीता एक अतिरिक्त शिपाई नियुक्तीबाबत..<br>(टिपणी : नोव्हेंबर 2015 मध्ये आयोजित केलेल्या विविध शिक्षणक्रमांच्या पुरवणी परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. या परीक्षेसाठी नवीन परीक्षा कार्यपद्धती राबविण्यात येत असल्यामुळे सर्व विभागीय केंद्र आणि परीक्षा केंद्रांवरील प्रतिनिधींची एक बैठक दि. 18.11.2015 रोजी विद्यापीठ मुख्यालयात घेण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार व मा.कुलगुरूंच्या मान्यतेनुसार या परिक्षेकरीता एक अतिरिक्त शिपाई नेमण्यास आणि दि. 19.3.2015 च्या बैठकीच्या मान्य मानधन दरानुसार मानधन अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्ताव माहितीसाठी व कार्योत्तर मंजूरीसाठी सादर.) (सोबत सहपत्र-D)<br>**वि.स. ठराव** - मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेण्यात आली, सदरची बाब व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मंजूरीस्तव सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 152.3.3<br>वि.स. बैठक<br>6.3.3 | विद्यापीठाच्या 22 व्या पदवीदान समारंभासाठी प्रमाणपत्रे व ऑक्टोबर- नोव्हेंबर 2015, मे 2016 मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी गुणपत्रके व विविध प्रमाणपत्रे छपाईसाठी आमंत्रित केलेल्या निविदा अंतिम करून एजन्सी निश्चित केली. त्याद्वारे 2015-16 आर्थिक वर्षासाठी रु.25,00,000/- तर सन 2016-17 साठी रु.4,75,00,000/- असे एकूण अंदाजे रु. 5 कोटी छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...<br>(टिपणी: विद्यापीठाच्या 22 व्या पदवीदान समारंभासाठी प्रमाणपत्रे व ऑक्टोबर-नोव्हेंबर 2015, मे 2016 मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी गुणपत्रके व विविध प्रमाणपत्रे छपाईसाठी आमंत्रित निविदा अंतिम करण्यात आली असून रु. 5 कोटी छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी. )(सहपत्र E)<br>**वि.स.ठराव** - गुणपत्रके व विविध प्रमाणपत्रे छपाईसाठी केलेल्या निविदा, निश्चित केलेल्या एजन्सी, तसेच नोव्हेंबर 2015 मध्ये झालेल्या परीक्षेसाठी करण्यात आलेल्या रु.25,00,000/- खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात आली.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या ठरावानुसार कार्योत्तर मंजूरीची नोंद घेण्यात आली.** |
| | 152.3.4<br>वि.स.ठराव<br>6.4.2 | दि. 23.9.2015, 24.11.2015 आणि 7.1.2016 रोजी झालेल्या खरेदी समिती सभांचे इतिवृत्त मंजूरीस्तव सादर. (सहपत्र F)<br>**वि.स.ठराव** - खरेदी समिती सभा दि. 23.9.2015, 24.11.2015 आणि 7.1.2016 रोजी झालेल्या खरेदी समिती बैठकांच्या इतिवृत्तांची नोंद घेण्यात येऊन त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारसीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |
| | 152.3.5<br>वि.स.ठराव<br>6.4.3 | डिसेंबर 2015 अखेर गुंतवणूक अहवाल माहिती व मंजूरीस्तव सादर. (सहपत्र G)<br>**वि.स.ठराव** - डिसेंबर 2015 अखेर गुंतवणूक अहवालाची नोंद घेण्यात आली व त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीच्या ठरावानुसार नोंद घेण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| 152.4.0 | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| | 152.4.1<br>वि.स.ठराव<br>6.4.1 | हब देखभालीसाठी येणाऱ्या रु.31,56,000/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठात इसरो प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या आभासी शिक्षण केंद्र (Virtual Learning Center) करीता विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडल आणि यशदा यांच्या सुयंक्त विद्यमाने विविध शैक्षणिक , सामाजिक, व प्रशासकीय कार्यक्रमांचे प्रसारण करण्यात येते. याकरीता नाशिक व पुणे येथे विद्यापीठाचे स्टुडीओ उभारण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्याकरीता उपग्रहामार्फत कार्यक्रम राबविण्यासाठी विद्यापीठ मुख्यालय नाशिक येथे Extended C band Hub यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. या हबवरुन मुक्त विद्यापीठ, यशदा आणि बी.टी.ई. ( तंत्र शिक्षण मंडळ) यांचे कार्यक्रम Interactive पध्दतीने राबविले जातात.<br>सदरचा हब आणि आभासी शिक्षण केंद्रावरील(Virtual Learning Center) उपग्रह केंद्र (Sattelite Interactive Terminals) SIT येथील उपकरणांच्या देखभालीसाठी इसरोच्या मार्गदर्शनाखाली विहित पध्दतीचा अवलंब करुन Infinium (India) Ltd. Ahmedabad यांच्याशी Extended C-Band Hub, (OEM M/S. VIASAT) , Teaching Ends of Maharashtra Edusat Network including UPS (Nashik & Pune) Satelite Interactive Terminals i) YASHADA Cener for Maharashtra Edication Network, ii) MSBTE Center of Maharastra Education Network. Trainnet server Software, Teaching end software which includes free upgradesm, free maintenance updates, bug fixation etc. Installation and commissioning of VSAT, peripherals and software (fresh installation) यासंदर्भात तीन वर्षाचा समावेशक देखभाल करार (Comprehensive Annual Maintenance Contract)करण्यात आलेला आहे. याची मुदत मार्च 2016 पर्यंत आहे.<br>नाशिक येथील हब हे मुक्त विद्यापीठ, यशदा आणि बी.टी.ई. मिळून वापरात असल्याने हबवरील देखरेखीचा खर्च हा विभागून करावे असे ठरले आहे. त्यानुसार हबवरील खर्चाचा हिस्सा बी.टी.ई. आणि यशदा कडून प्राप्त होतो.<br>सन 2015-16 या आर्थिक वर्षाकरीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपग्रह केंद्राच्या(Sattelite Interactive Terminals) SIT देखभालीकरीता समावेशक वार्षिक देखभाल करारास मुदतवाढ न देता त्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. (सोबत पत्र प्रत)<br>या कारणास्तव समावेशक करारांतर्गत असलेल्या हबचा देखभाल खर्च हा यापूर्वी मुक्त विद्यापीठ, यशदा आणि बी.टी.ई. मिळून वापरात असल्याने तीन हिस्स्यामध्ये विभागला जात होता. तो. मुक्त विद्यापीठ आणि यशदा यांच्यात विभागला जाणार आहे.<br>चालू आर्थिक वर्षातच यशभारती इस्त्रोप्रकल्पांतर्गत असणाऱ्या Extended C-Band Hub, (OEM M/S. VIASAT) , Teaching Ends of Maharashtra Edusat Network including UPS (Nashik & Pune) Satelite Interactive Terminals i) YASHADA Cener for Maharashtra Edication Network, ii) MSBTE Center of Maharastra Education Network. Trainnet server Software, Teaching end software which includes free upgradesm, free maintenance updates, bug fixation etc. Installation and commissioning of VSAT, peripherals and software (fresh installation) या सर्वासंदर्भात केलेल्या सर्व समावेशक देखभाल करार (CAMC) नुसार Infinium (India) Ltd. Ahmedabad यांना हबचा खर्च अदा करावा लागणार आहे.<br>सदर हबवरील CAMC Charges ला वित्त समिती व व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मांडण्यात आला आहे. तथापि नव्या घडामोडीमुळे यशदा व मुक्त विद्यापीठावर खर्चाचा एकूण बोजा येणार आहे. हबचा देखभालीवर वार्षिक खर्च रक्कम रु. 31,56,067/- (सर्व करांसह) इतका आहे.यात पूर्वीच्या पध्दतीत मुक्त विद्यापीठावर 1/3 खर्च म्हणजे रु, 10,52,022/- इतका लागत होता. आता बी.टी.ई. चा हिस्सा न मिळाल्यामुळे रक्कम रु. 21,04,044/- खर्च लागेल. यशदा यांना या घडामोडीबाबत कळविण्यात येत आहे. त्यांनी विनंती मान्य केल्यास विद्यापीठावर हब देखभालीसाठी रु. 15,78,034/- इतका खर्च येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | वरील बाब लक्षात घेता हब देखभालीसाठी रु.31,56,000/- (रु. एकतीस लक्ष छपन्न हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता मिळावी व वरील बाब वित्त समिती व व्यवस्थापन मंडळास कळविण्यास मंजूरी द्यावी ही विनंती. (सहपत्र H)<br>**वि.स.ठराव** - करारानुसार हब देखभालीसाठी यशदा कडून रु.15,78,000/- विद्यापीठास प्राप्त होतील व विद्यापीठाचा भाग रु.15,78,000/- अशा एकत्रित रक्कम रु.31,56,000/- चा खर्च विद्यापीठाकडून करण्यात येईल, यास मान्यता देण्यात येऊन व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.<br>तसेच हब वापराबाबतचा सविस्तर अहवाल (Utility Report) घेण्यात यावा व तो पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा. तोपर्यंत पुढील वर्षासाठीचा देखभाल करार करण्यात येऊ नये असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 152.4.2<br>वि.स.ठराव<br>6.5.1 | B.Ed. Spl.Ed., शिक्षणक्रमाचे समंत्रण सत्रे तसेच प्रात्यक्षिकांच्या मानधनाचे दर निश्चिती करणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठातर्फे B.Ed. Spl. Ed. हा शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून सुरु करण्यात आला आहे. या शिक्षणक्रमाच्या संपर्स सत्रांमध्ये तात्विक आणि प्रात्यक्षिक भागांवरील समंत्रण सत्रे, तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाणार आहे. या तिनही भागांशी संबंधित मानधनाचे दर दोन वर्षीय बी.एड. शिक्षणक्रमातील मानधनाचे दर मूलाधार गृहित धरून निश्चित करण्यात आलेले आहेत, ते सोबत जोडलेले आहेत. सदर दरांची देयके अभ्यास केंद्राकडे जमा होणाऱ्या शुल्कातून अदा करण्यात येणार आहेत. सोबतच्या दरांचा तक्ता मंजूरीस्तव सादर. (सहपत्र I)<br>**वि.स.ठराव** - B.Ed. Spl. Ed. शिक्षणक्रमाचे समंत्रण तसेच प्रात्यक्षिकांच्या मानधनाच्या दरांना व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार व टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे जोडलेल्या सहपत्रानुसार मानधन व दर अदा करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 152.4.3<br>वि.स.ठराव<br>6.5.2 | विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहातील संगणक लॅबचे भाड्याचे दर निश्चित करणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठ परिसरातील निवास, हॉल, कॅन्टीन यांचे भाडे दर व्यवस्थापन मंडळाने निश्चित केलेले आहेत. परंतु शैक्षणिक सभागृहातील संगणक लॅबचे भाडे अद्याप निश्चित केलेले नसल्याने रु.5,000/- प्रतिदिन प्रस्तावित केलेले आहेत. सदर दर मंजूरीस्तव सादर. (सहपत्र J)<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहातील संगणक लॅबचे भाडे रु.5,000/- आकारण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 152.4.4<br>वि.स.ठराव<br>6.5.3 | चित्रपट निर्मात्यांना चित्रीकरण करण्यासाठी तसेच क्रिडा स्पर्धा/सांस्कृतिक कार्यक्रमांना विद्यापीठ परिसर व इमारती उपलब्ध करून देण्यासाठी भाड्याचे दर निश्चित करणेस मंजूरी देणेबाबत...<br>(टिपणी : विविध चित्रपट निर्माते, शासकीय निमशासकीय संस्था तसेच काही खाजगी संस्थांकडून चित्रीकरण करण्यासाठी, क्रिडा स्पर्धा/सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी विद्यापीठ परिसर व इमारती उपलब्ध करून देण्याबाबत मागणी करतात. यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीच्या दिनांक 17/7/2015 रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर समितीने मान्य केलेले दर वित्त समितीच्या मंजूरीस्तव सादर. (सहपत्र-K)<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठ परिसर व इमारती चित्रीकरणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाच्या फायद्याच्यादृष्टीने दर ठरवावेत. त्यानुसार समितीने वित्त समितीच्या बैठकीत सुधारित दर सादर केले. एक वर्षासाठी प्रायोगिक तत्त्वावर हे सुधारित दर आकारण्यात यावेत. त्यानंतर त्यात योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात. सदर बाब व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारसीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार व टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे जोडलेल्या सहपत्रानुसार सुधारित दर आकारण्यास मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 152.4.5<br>वि.स.ठराव<br>6.5.4 | दि. 17 ते 19 मार्च 2016 दरम्यान कोलालंपूर (मलेशिया) येथे कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या परिषदेस मा.कुलगुरू उपस्थित रहाणार आहेत. यासाठी विमान प्रवास खर्च रु.50,000/- अपेक्षित आहे. या खर्चास मंजूरी देणेबाबत..<br>(टिपणी: दि. 17 ते 19 मार्च 2016 दरम्यान कोलालंपूर (मलेशिया) येथे कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या परिषदेस (High Level Round Table for Vice-Chancellors & Heads of ODL Institutions) मा.कुलगुरू उपस्थित रहाणार आहेत. यासाठी विमान प्रवास खर्च रु.50,000/- अपेक्षित आहे. इतर खर्च उदा. राहण्याचा व तेथील स्थानिक प्रवास, इ. चा खर्च संबंधित विद्यापीठ करणार आहे. विमानप्रवासासाठी येणारा खर्च रु.50,000/- मंजूरीस्तव सादर..(सहपत्र-L)<br>**वि.स.ठराव** - दिनांक 17 ते 19 मार्च 2016 दरम्यान मलेशिया येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या परिषदेस मा.कुलगुरूंना उपस्थित रहाणेसाठी येणाऱ्या अपेक्षित खर्च रु.50,000/- यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारसीसह सादर.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार मान्यता देण्यात आली.** |
| | 152.4.6<br>संगणक केंद्र | संगणक व संगणकिय साहित्य निर्लेखन (SCRAP) प्रक्रिया 2015-16 राबविण्याची बाबत विचारार्थ सादर (सहपत्र M)<br>(टिपणी - विद्यापीठात सहारा व पीसीएस संगणक व संगणकीय साहित्य - प्रिंटर्स, यु.पी.एम., स्कॅनर खरेदी केलेले आहे. वेळोवेळी ते दुरुस्त करण्यात आलेले आहे. परंतु नादुरुस्त असलेल्या संगणक व संगणकीय साहित्य यांचा दुरुस्तीचा खर्च जास्त आहे. तसेच काही संगणकांचे सुटे भाग बाजारात उपलब्ध नाहीत. त्यामुळे वरील सर्व संगणक व संगणकीय साहित्य ह्यांना 7 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिल्यानंतर हे संगणक व संगणकीय साहित्य निर्लेखित (SCRAP) करण्यात येईल. (१) संगणक व संगणकीय साहित्य निर्लेखित प्रक्रिया राबविणेस मान्यता द्यावी.(२) निर्लेखन समिती, तांत्रिक समिती व लिलाव समितीच्या कार्यप्रणालीस मान्यता द्यावी. (३) निर्लेखन समिती, तांत्रिक समिती व लिलाव समिती सदस्य नियुक्तीस मान्यता द्यावी.) (सहपत्र M)<br>**व्य.मं.ठराव: टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे 1 ते 3 मुद्यांना मान्यता व निर्लेखन व तांत्रिक समितीमध्ये बहिस्थ तांत्रिक तज्ञ नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना देण्यात आले.** |
| 152.5.0 | 152.4.7<br>सभा व दप्तर कक्ष | श्री.रविंद्र लक्ष्मण सोनवणे यांचे रुपये 128378/- वैद्यकिय देयक व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर<br>(टिपणी - श्री. रविंद्र सोनवणे यांचे वैद्यकिय देयकाची प्रशासकीय पूर्तता करण्यात आलेली आहे. त्यात वित्त विभागाने दिलेला अभिप्राय – (१) शासननिर्णय/परिपत्रक क्र.वैखप्र-2013/प्र.क्र291/13/राकावि-2 दि.11/10/2013 अन्वये शासन मान्यता दिलेल्या रुग्णालयाच्या यादीत सिनर्जी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांस मान्यता नाही. (२) शासन निर्णय वैखप्र/प्र.क्र333/11/राकावि-2 दिनांक 16/11/2011 अन्वये वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची कमाल मर्यादा रु.100000/- पर्यंतच्या प्रतिपूर्तीस मंजुरीचे अधिकार विभागप्रमुखांना म्हणजे विद्यापीठाचे बाबतीत मा.कुलगुरुंना आहेत. (३) रु.100000/- वरील देयक असल्याने प्रशासकीय विभागप्रमुखांना (मंत्रालयीन) अधिकार असल्याने याबाबत योग्य त्या निर्णयासाठी आदेशार्थ सादर)<br>**व्य.मं.ठराव: रविंद्र सोनवणे यांचे वैद्यकिय देयक रुपये 128378/- अदा करण्यास मान्यात देण्यात आली.** |
| | 152.4.8<br>बांधकाम विभाग<br><u>3/400/2015/</u><br><u>13.03</u> | विद्यापीठ प्रांगणात सौर उर्जाव्दारे विज निर्मिती करणे व ते विद्यापीठाच्या सर्व इमारतींना पुरविणे तसेच विद्यापीठ परिसरातील व सर्व इमारतीतील लाईट एलईडीमध्ये रुपांतरीत करण्याची बाब विचारार्थ सादर (सहपत्र N)<br>(टिप्पणी : विद्यापीठ आवारातील 150 एकर मधील एकूण 21 इमारती तसेच जवळपास 200 स्ट्रीट लाईट, 12 विद्युत पंप, इत्यादीसाठी विज वितरण कंपनी विद्युत पुरवठा घेतला जातो. त्यासाठी 675 कीवॅ इतका लोड मंजूर असून व 500 केव्हीए इतका सप्लाय मंजूर आहे. विद्यापीठाला संपूर्ण यंत्राला विद्युत पुरवठासाठी अदांजे मासीक रु. 6 लक्ष अधिक इंधन खर्च करावा लागतो. सध्या सोलर विज निर्मितीवर देशभरात भर दिला जात असून यासाठी विविध विद्यापीठ व शासकीय /निमशासकीय संस्थानी यांचा वापर सुरु केला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | त्याच धर्तीवर जर विद्यापीठात सौर उर्जा प्रकल्प व एलईडी लाईन कन्व्हजन करण्याचा मानस आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सोबत जोडला आहे. सदरहू प्रस्ताव समिती सदस्यांच्या विचार्थ सादर) (सोबत जोडलेले परिशिष्ट) <br> **ठराव क्र. अ/400/2015/13.03** <br> विद्यापीठात सौर उर्जा प्रकल्प व एलईडी लाईन कन्व्हजन करण्याच्या प्रस्तावाबाबत मा.कार्यकारी अभियंता यांनी समिती सदस्यांना सविस्तर माहीती दिली. यावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की सदरहू प्रकल्पासाठी विद्यापीठाला कोणताही आर्थिक खर्च नसल्यामुळे सदरहू प्रकल्पासाठी जाहीरात देवून प्रस्ताव मागवावेत व पुढील बांधकाम समितीत त्याचा Demo दाखविण्यासाठी बोलविण्यात यावे त्यासाठी महाउर्जा खात्यांचा प्रमुख तसेच सौर उर्जामधील एकाद्या इंजिनिअरिंग कॉलेजचे तज्ञ यांना आमंत्रित करण्यात यावे व त्यानंतर बांधकाम समितीला ज्यांचा Demo योग्य वाटेल व फायदेशीर असेल अशा ठेकेदार/कंपनीला निविदा देण्यात यावी व सदरहू ठराव व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले. <br> **व्य.मं.ठराव: बांधकाम समितीच्या ठरावानुसार विद्यापीठात सौरउर्जा प्रकल्प व एलईडी लाईन कन्व्हजन करण्याच्या Expression of Interes साठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुकांना विद्यापीठात त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी बोलवण्यात यावे त्यानंतर टेंडर प्रक्रिया करण्यात यावी यांस मान्यता देण्यात आली.** |
| 152.5.0 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय |
| | 152.5.1 | विद्यापीठामध्ये डेटा सेंटर सुरु करणेबाबतची बाब विचारार्थ सादर. <br> (टिपणी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना 1 जुलै 1989 मध्ये झाली असून मागील 26 वर्षात विद्यापीठाने मोठ्याप्रमाणात प्रगती केलेली आहे. विद्यापीठाची महाराष्ट्रभर 8 विभागीय केंद्रे कार्यरत असून जवळपास चार हजार अभ्यासकेंद्रा मार्फत 190 च्यावर शिक्षणक्रम कार्यान्वयीत केलेली आहेत. साधारणपणे दरवर्षी 6,50,000 विद्यार्थी विविध शिक्षणक्रमास प्रवेश घेतात. विद्यापीठाने नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे ठरवले असून सध्या एम.के.सी.एल मार्फत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. <br> विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्रे, विद्यार्थी संख्या यांचा कायम स्वरुपी डेटा विद्यापीठाकडे असणे आवश्यक आहे त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या राजेश अगरवाल समितीने निर्देशित केल्यानुसार प्रत्येक विद्यापीठात स्वतचे डेटा सेंटर सुरु करावे. असे सुचविले आहे. त्यानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात स्वताचे डेटा सेंटर सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यांस विद्यापीठाच्या नियोजन मंडळ व विद्वत परिषदेने मंजूरी दिली असून व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीसाठी सादर. <br> **व्य.मं.ठराव: नियोजन मंडळ व विद्वत परिषदेने दिलेल्या मंजूरीनुसार विद्यापीठात स्वताचे डेटा सेंटर सुरु करण्यास व ई टेंडर प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली.** |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ